अ.क्र. २९६/सं.५
१५/७/२०१४

**महाराष्ट्र शासन**

क्र.अधापु २०१४/प्र.क्र९६ /नापु-२२
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक : १० .०७.२०१४.

प्रति,

१) नियंत्रक, शिधावाटप, मुंबई व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
२) सर्व उपायुक्त (पुरवठा),
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/ सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,

**विषय:-** **राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृह यांना एप्रिल,२०१४ ते सप्टेंबर,२०१४ या कालावधीकरिता अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर करणेबाबत**

संदर्भ:- १) केंद्र शासनाचे पत्र क्र.४-६/२०१४/बीपी-२, दि. ९.०७.२०१४.
२) शासन निर्णय क्र.साविव्य १००२/११३७/प्र.क्र.९७३/नापु-२८, दि.२६.४.२००२.

केंद्र शासनाने त्यांच्या दि. ९.०७.२०१४ च्या पत्रान्वये राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृह यांना माहे एप्रिल, २०१४ ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीकरिता बीपीएल दराने अन्नधान्याचे मासिक नियतन वितरीत करण्यासाठी गहू ४५०० मे.टन व तांदूळ १९०० मे.टन असे एकूण ६४०० मे.टन अन्नधान्य मंजूर केले आहे. त्यानुसार जिल्हानिहाय नियतन सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आले आहे. सदर नियतनाची उचल भारतीय अन्न महामंडळाकडे बीपीएल दराने पैसे भरून करण्यात यावी.

केंद्र शासनाने उपरोक्त पत्रान्वये मंजूर केलेल्या नियतनापैकी माहे एप्रिल, २०१४ ते जुलै, २०१४ या महिन्यांकरिता मंजूर केलेल्या नियतनाची रक्कम जमा करण्यासाठी व धान्याची उचल करण्यासाठी केंद्र शासनाच्या दि. ९.०७.२०१४ रोजीच्या पत्राच्या दिनांकापासून अनुक्रमे ४५ दिवस व ५० दिवसांपर्यंत मुदत असल्याचे कळविले आहे. तसेच त्यापुढील माहे ऑगस्ट, २०१४ ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीकरिता भारतीय अन्न महामंडळाकडे धान्याची रक्कम जमा करून अन्नधान्याची उचल केंद्र शासनाच्या तात्काळिक/ अनुषंगिक सूचनेनुसार करण्यात यावी असे केंद्र शासनाच्या उपरोक्त पत्रात नमूद केलेले आहे. सबब, भारतीय अन्न महामंडळाच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे संपर्क साधून त्याबाबत खात्री करावी व विहित मुदतीतच धान्याची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करून धान्याची पूर्ण उचल होईल याची दक्षता घ्यावी.

कल्याणकारी संस्था व वसतीगृह यांना धान्य वितरीत करावयाच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर आदेश संदर्भाधिन दि. २६ एप्रिल, २००२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर



अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
नोंदवही क्रमांक....
15 JUL 2014
३२६९ ती.१०/०७/१४
कार्यासन क्रमांक.........
अनु. क्रमांक.........

शासन निर्णयातील मार्गदर्शनक सूचनानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच मंजूर नियतनाची उचल विहित मुदतीत पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी.

राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृहे या योजनेअंतर्गत माहे एप्रिल, २०१३ ते सप्टेंबर, २०१३ या कालावधीचे उपयोगिता प्रमाणपत्र दि. ८.०७.२०१४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर केलेले आहे. त्यामध्ये १५७८७.७६८३ मे. टन अन्नधान्य वाटपाअभावी शिल्लक असल्याचे कळविण्यात आले आहे. माहे ऑक्टोबर, २०१३ ते मार्च, २०१४ या कालावधीत या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून अन्नधान्याचे नियतन देण्यात आले नसल्याने पुढील कालावधीसाठी (माहे एप्रिल, २०१४ ते सप्टेंबर, २०१४) देण्यात आलेल्या नियतनाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करताना उपरोक्त शिल्लक धान्याचे उपयोगिता प्रमाणपत्रदेखील सादर करण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्यानुसार ज्या जिल्ह्यांकडे माहे सप्टेंबर, २०१३ अंती वाटपाअभावी अन्नधान्याची शिल्लक दर्शविण्यात आली आहे, त्या जिल्ह्यांनी सदर शिलकीच्या प्रमाणात माहे ऑक्टोबर, २०१३ ते मार्च, २०१४ या कालावधीसाठी सदर शिल्लक अन्नधान्य लाभार्थ्यांना वितरित करणे अपेक्षित होते. तसेच आता मंजूर केलेल्या नियतनाची उचल करुन वाटप करणेदेखील आवश्यक आहे. **भारतीय अन्न महामंडळाकडून उचल केल्यानंतर प्रत्येक महिन्यात वाटप झालेल्या अन्नधान्याची आकडेवारी अद्यावत करुन मागील शिलकीचे व एप्रिल, २०१४ ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीच्या अन्नधान्याचे स्वतंत्र उपयोगिता प्रमाणपत्र माहे ऑक्टोबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात न चुकता शासनास सादर करावे.**

शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार गहू व तांदूळाची उचल वाटप आणि एकूण खर्च याची माहिती प्रत्येक महिन्यास शासनास तसेच वि.स.उ.स. यांना पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत पाठवावी. तसेच या नियतनाची उचल व वाटपाबाबतची माहिती दरमहा महाफुड आज्ञावली मध्ये न चुकता भरली जाईल याची दक्षता घ्यावी.

सोबत विवरणपत्र

( हेमंत वाडीकर )
कक्ष अधिकारी

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१) महाव्यवस्थापक, भारतीय अन्न महामंडळ, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे मंजूर केलेले नियतन मुक्त (release) करण्याच्या सूचना सर्व जिल्हा प्रबंधक, भारतीय अन्न महामंडळ यांना तात्काळ द्याव्यात.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
३) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई. नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील महाफुड आज्ञावलीद्वारे प्राप्त करून घ्यावा.
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच नियंत्रक, शिधावाटप यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेशान्वये नियतन विचारात घेऊन अन्नधान्याचे वाटप करावे व वाटपानंतरचा प्रत्येक महिन्यातील अंतिम शिलकीचा अहवाल (progressive report) प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेस

संबंधित विभागाच्या उपायुक्त पुरवठा यांना न चुकता सादर करावा व सर्व उपायुक्त पुरवठा यांनी दर महिन्याच्या १० तारखेस पुरवठा आयुक्त कार्यालयास सादर करावा व त्या कार्यालयाने दर महिन्याच्या १५ तारखेस संपूर्ण राज्याचा एकत्रित अहवाल राज्य शासनास सादर करावा.

५) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व तसेच नियंत्रक, शिधावाटप यांनी याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता दि.१५.१०.२०१४ पूर्वी शासनास सादर करावे.

( हेमंत वाडीकर )
कक्ष अधिकारी

प्रत,

१) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
यांना विनंती करण्यात येते की, वरील प्रमाणे प्राप्त झालेली माहिती तपासून राज्याची एकत्रित माहिती शासनास सादर करावी.

२) कक्ष अधिकारी, नापु-२८, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

३) अवर सचिव (संगणक कक्ष), अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाचे आदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावेत.

४) निवड नस्ती - नापु-२२.

D:\Typist\Welfare institutioin\OWS ALLOCATION 2014-15\NIYATAN AADESH.docx

शासन पत्र क्र. अधापु-२०१४/प्र.क्र.९६/नापु-२२ दि. १० जुलै, २०१४ सोबतचे विवरणपत्र.

**Monthly Allocation Welfare Institutions Scheme for the Period from April, 2014 to September ,2014.**

| SR.NO. | DISTRICTS | NO OF INSTIUTIONS | NO OF BENEFICIARIES | QUANTUM OF FOODGRAINS (KG) | | | MONTHLY ALLOCATION (MT) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL |
| 1 | MUMBAI | 73 | 14718 | 10 | 5 | 15 | 135 | 40 | 175 |
| 2 | THANE | 168 | 49036 | 5 | 10 | 15 | 225 | 264 | 489 |
| 3 | RAIGAD | 17 | 7107 | 5 | 10 | 15 | 33 | 38 | 71 |
| 4 | RATNAGIRI | 55 | 4083 | 5 | 10 | 15 | 19 | 22 | 41 |
| 5 | SINDHUDURG | 13 | 869 | 5 | 10 | 15 | 4 | 5 | 9 |
| 6 | NASIK | 194 | 43207 | 10 | 5 | 15 | 396 | 116 | 512 |
| 7 | DHULE | 100 | 12565 | 10 | 5 | 15 | 115 | 34 | 149 |
| 8 | NANDURBAR | 86 | 5035 | 10 | 5 | 15 | 46 | 14 | 60 |
| 9 | JALGAON | 130 | 17829 | 10 | 5 | 15 | 163 | 48 | 211 |
| 10 | AHMEDNAGAR | 106 | 8605 | 10 | 5 | 15 | 79 | 23 | 102 |
| 11 | PUNE DSO | 87 | 12023 | 10 | 5 | 15 | 110 | 32 | 143 |
| 12 | PUNE FDO | 120 | 48910 | 10 | 5 | 15 | 448 | 132 | 580 |
| 13 | SATARA | 132 | 9516 | 10 | 5 | 15 | 87 | 26 | 113 |
| 14 | SANGALI | 70 | 4500 | 10 | 5 | 15 | 41 | 12 | 53 |
| 15 | SOLAPUR DSO | 78 | 5955 | 10 | 5 | 15 | 55 | 16 | 71 |
| 16 | SOLAPUR FDO | 7 | 1658 | 10 | 5 | 15 | 15 | 4 | 20 |
| 17 | KOLHAPUR | 60 | 5670 | 10 | 5 | 15 | 52 | 15 | 67 |
| 18 | AURANGABAD | 97 | 9094 | 10 | 5 | 15 | 83 | 24 | 107 |
| 19 | JALNA | 70 | 9317 | 10 | 5 | 15 | 85 | 25 | 110 |
| 20 | BEED | 215 | 19447 | 10 | 5 | 15 | 178 | 52 | 231 |
| 21 | NANDED | 271 | 32771 | 10 | 5 | 15 | 300 | 88 | 389 |
| 22 | PARBHANI | 171 | 13025 | 10 | 5 | 15 | 119 | 35 | 154 |
| 23 | HINGOLI | 75 | 8143 | 10 | 5 | 15 | 75 | 22 | 97 |
| 24 | LATUR | 225 | 17182 | 10 | 5 | 15 | 158 | 46 | 204 |
| 25 | OSMANBAD | 114 | 9967 | 10 | 5 | 15 | 91 | 27 | 118 |
| 26 | AMRAVATI | 170 | 25000 | 10 | 5 | 15 | 229 | 67 | 296 |
| 27 | AKOLA | 178 | 8054 | 10 | 5 | 15 | 74 | 22 | 95 |
| 28 | WASHIM | 103 | 7924 | 10 | 5 | 15 | 73 | 21 | 94 |
| 29 | BULDHANA | 255 | 15794 | 10 | 5 | 15 | 145 | 42 | 187 |
| 30 | YAVATMAL | 259 | 26287 | 10 | 5 | 15 | 241 | 71 | 312 |
| 31 | NAGPUR DSO | 113 | 11167 | 10 | 5 | 15 | 102 | 30 | 132 |
| 32 | NAGPUR FDO | 67 | 9955 | 10 | 5 | 15 | 91 | 27 | 118 |
| 33 | WARDHA | 86 | 5856 | 10 | 5 | 15 | 54 | 16 | 69 |
| 34 | BHANDARA | 86 | 8014 | 5 | 10 | 15 | 37 | 43 | 80 |
| 35 | GONDIA | 113 | 17776 | 5 | 10 | 15 | 81 | 96 | 177 |
| 36 | CHANDRAPUR | 164 | 29600 | 5 | 10 | 15 | 136 | 159 | 295 |
| 37 | GADCHIROLI | 154 | 27112 | 5 | 10 | 15 | 124 | 146 | 270 |
| | TOTAL | 4482 | 562711 | | | | 4500 | 1900 | 6400 |